**अनेक वर्षापासून रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अंतिम परिशिष्ट-२ निर्गमीत झाल्यानंतर त्यामधील झोपडीचे हस्तांतरण/ खरेदी-विक्री करणा-या झोपडीधारकांकरिता एकवेळची अभय योजनेस मुदतवाढ देण्याबाबत.**

**<u>महाराष्ट्र शासन</u>**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- विसआ- २०२३/प्र.क्र. १५९/झोपनि-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १४ डिसेंबर, २०२५.

**संदर्भ :-** १) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दि.०१.१०.२०२४
२) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दि.१५.१०.२०२४
३) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दि.१७.०३.२०२४

**<u>प्रस्तावना :-</u>**

अनेक वर्षापासून रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील दि.०१.०१.२०११ पुर्वी निर्गमीत केलेल्या अंतिम परिशिष्ट-२ मधील झोपडीधारकांनी झोपडीचे हस्तांतरण केल्यास विकत घेणाऱ्या झोपडीधारकाचे नाव मूळ परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने, वारसाहक्काने हस्तांतरणाची प्रकरणे वगळता अन्य प्रकारे हस्तांतरण/खरेदी-विक्री करणाऱ्या झोपडीधारकांसाठी उक्त संदर्भाधीन १ व २ येथील शासन निर्णयांन्वये अनुक्रमे बृहन्मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकवेळची अभय योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली होती. शासनाच्या दि.१७.०३.२०२५ रोजीच्या निर्णयान्वये, अभय योजनेला ०३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. अभय योजने दिलेली सदर मुदतवाढ दि.३१.०३.२०२५ रोजी संपुष्टात आलेली आहे. यासंदर्भात मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) महोदयांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये दि.१३.१२.२०२५ रोजी विधिमंडळ सभागृहामध्ये या

योजनेस दि.३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत निवेदन केले आहे. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णय :-**

बृहन्मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मागील अनेक वर्षापासून रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील दि.०१.०१.२०११ पुर्वी निर्गमित केलेल्या अंतिम परिशिष्ट-२ मधील झोपडीधारकांनी झोपडीचे हस्तांतरण केल्यास विकत घेणाऱ्या झोपडीधारकाचे नाव मूळ परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने, वारसाहक्काने हस्तांतरणाची प्रकरणे वगळता अन्य प्रकारे हस्तांतरण/खरेदी-विक्री करणाऱ्या झोपडीधारकांसाठी राबविण्यात येणाऱ्या **एकवेळच्या अभय योजनेस दि.३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत आहे.

२. सदर अभय योजना राबविण्याबाबतच्या अटी व शर्ती संदर्भ क्र. १ येथील दि.०१.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक................................असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(संदिप पाटील)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति :-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा. सभापती/ मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४) सर्व सन्माननीय महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा सदस्य.
५) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उप मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. उप मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/महाराष्ट्र-२, मुंबई/नागपूर.
१०) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, नगरविकास विभाग-१ व २ यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
१२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१३) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे.